सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

प्राधिकृत प्रकाशन

वर्ष १२ वे, राजपत्र क्र. २२] गुरुवार ते बुधवार, मे/जून २८-३, २०२६ : ज्येष्ठ ७-१३, शके १९४८ [पृष्ठे - २०

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

भाग एक–छत्रपती संभाजीनगर विभागीय पुरवणी

अनुक्रमणिका

भाग एक-शासकीय अधिसूचना, नेमणुका, पदोन्नती, अनुपस्थितीची रजा (भाग एक-अ, चार-अ, चार-ब व चार-क यामध्ये प्रसिध्द करण्यात आलेले आहेत त्याच्याव्यतिरिक्त) केवळ छत्रपती संभाजीनगर विभागाशी संबंधित असलेले नियम व आदेश.	पृष्ठे ५४७ ते ५४९	भाग एक-अ (भाग चार-अ मध्ये प्रसिध्द करण्यात आले आहेत त्या व्यतिरिक्त) केवळ छत्रपती संभाजीनगर विभागाशी संबंधित असलेले महाराष्ट्र नगरपालिका, जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपंचायती, नगरपरिषदा, जिल्हा नगरपरिषदा, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम, या अन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना.	पृष्ठे – ते –
संकीर्ण अधिसूचना, नेमणुका, पदोन्नती इत्यादी केवळ छत्रपती संभाजीनगर विभागाशी संबंधित असलेले.	५५० ते ५६६		

शासकीय अधिसूचना, नेमणुका, पदोन्नती इत्यादी

१

अवर सचिव, महाराष्ट्र शासन यांजकडून

नगर विकास विभाग

चौथा मजला, मुख्य इमारत मंत्रालय,

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

दिनांक :- २७/०२/२०२६

अधिसूचना

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ :-

क्रमांक टिपीएस - ३०१५/१५४९/प्र.क्र.२८८/२०१५/नवि -३० :- ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने अधिसूचना क्र.टिपीएस-३०८७/२२/सीआर-१/भाग-२/नवि-१२, दिनांक ०७ ऑक्टोबर, १९९१ नुसार महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ (सन १९६६ चा महाराष्ट्र ३७) (यापुढे "उक्त अधिनियम" असे संबोधीले आहे) च्या कलम ४०, उपकलम-१ चे खंड (बी) मधील अधिकारानुसार वाळूज अधिसूचित क्षेत्राकरीता, (यापुढे "उक्त अधिसूचित क्षेत्र" असे संबोधिले आहे) शहर व औद्योगिक विकास महामंडळाची विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्ती केली आहे. (यापुढे "सिडको" असे संबोधिले आहे);

आणि ज्याअर्थी, वाळूज अधिसूचित क्षेत्राची विकास योजना, उक्त अधिनियमाचे कलम ३१ अन्वये, नगर विकास विभागाची अधिसूचना क्र. टिपीएस-३०००/४४८४/सीआर-२३५(अ)/२०००/नवि-३०, दि.१४ ऑगस्ट, २००१ अन्वये भागशः मंजूर केली असून ती दि.०१ ऑक्टोबर, २००१ पासून अंमलात आली आहे. तसेच भागशः क्षेत्राची विकास योजना शासन अधिसूचना क्र.टिपीएस-३००१/१४९८/प्र.क्र.२५८(अे)/२००१/नवि-३०, दि. २३ जुलै, २००२ अन्वये भागशः मंजूर केलेली असून ती दिनांक १६ सप्टेंबर, २००२ पासून अंमलात आहे (यापुढे "उक्त विकास योजना" असे संबोधिले आहे);

आणि ज्याअर्थी, उक्त विकास योजनेमध्ये मौ. गोलवाडी मधील छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका आणि फेज-१ मधील नगर-४ यांच्या सीमांनी बध्द झालेले क्षेत्र ना-विकास क्षेत्र (No Urbanization Zone) म्हणून दर्शविले आहे (यापुढे "उक्त जमिन" असे संबोधले आहे.);

आणि ज्याअर्थी, सिडकोने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ (१) मध्ये दिलेली वैधानिक पध्दती अनुसरुन उक्त जमिन उक्त विकास योजनेतील ना-विकास विभागातून (No-Urbanization Zone) वगळून रहिवास विभागात समाविष्ट करणेबाबतचा फेरबदलाचा प्रस्ताव (यापुढे "प्रस्तावित फेरबदल" असे संबोधले आहे) शासनाच्या मंजूरीसाठी सादर केलेला आहे;

आणि ज्याअर्थी, आवश्यक त्या चौकशी नंतर व संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचा सल्ला घेतल्यानंतर प्रस्तावित फेरबदलाखालील क्षेत्र काही अटी व शर्ती सापेक्ष ना-विकास विभागातून (No-Urbanization Zone) वगळून रहिवास विभागात समाविष्ट करावे (भाग नकाशात दर्शविल्याप्रमाणे), असे शासनाचे मत झाले आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त जमिनीपैकी गट. क्र.११ पै. मधील श्रीमती ज्योती रंगनाथ काळे व श्रीमती पुष्पा प्रकाश काळे या जमीनींच्या मालकांनी बाजारमूल्य दर तक्त्यानुसार येणाऱ्या रकमेच्या ५% दराने येणाऱ्या अधिमूल्य रक्कमेपैकी शासनास देय असलेली अधिमूल्याची ५०% रक्कम रु.२,१२,३१७/- व रु. २,१२,३१७/- सहायक संचालक, नगर रचना, छत्रपती संभाजीनगर यांच्या लेखाशिर्षामध्ये चलनाने जमा केलेली आहे आणि नियोजन प्राधिकरणास देय असलेली ५% अधिमूल्यापैकी ५०% रक्कम रु.२,१२,३१७/- व रु. २,१२,३१७/- सिडको, वाळूज यांच्याकडे पावती अन्वये जमा केलेली आहे;

आता, त्याअर्थी उक्त अधिनियमाचे कलम ३७ पोटकलम (२) अन्वये व त्या अनुषंगाने असलेल्या इतर अधिकाराचा वापर करुन उक्त विकास योजनेतील प्रस्तावित फेरबदलास शासन मंजूरी देत आहे आणि त्यासाठी उपरोल्लेखित दि.१४ ऑगस्ट, २००१ ची अधिसूचना खालीलप्रमाणे सुधारीत करण्यात येत आहे :-

"विकास योजना मंजूरीच्या अधिसूचनेच्या फेरबदल सूचीतील शेवटच्या नोंदीनंतर पुढील नव्या नोंदीचा समावेश करण्यात येत आहे.

नोंद

"मौजे गोलवाडी येथील गट.क्र.११ (भाग) (क्षेत्र १.९६ हे, + १.९६ हे, एकूण ३.९२ हे,) मधील क्षेत्र भाग नकाशात दर्शविल्याप्रमाणे ना-विकास विभागातून (No- Urbanization Zone) वगळून रहिवास विभागात समाविष्ट करण्यात येत आहे."

***अट क्र. १** - प्रस्तावित १८ मी. रुंद रस्त्याची रुंदी २४ मी. रुंद नकाशात दर्शविल्याप्रमाणे करण्यात येत आहे.*

***अट क्र. २** - विषयांकित प्रस्तावात वाळूज महानगर विकास योजनेच्या तरतुदीप्रमाणे २५% जागा सिडकोस देणे बंधनकारक राहिल.*

***अट क्र. ३** - प्रस्तावाधिन जागेचा विकास करताना १०% खुल्या जागेव्यतिरिक्त, अतिरिक्त १०% सुविधा क्षेत्र प्रस्तावित करणे बंधनकारक राहील व सदर सुविधा क्षेत्राच्या विकासाबाबत, एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली, २०२० मधील विनियम क्र. ३.५ लागू राहिल.*

उक्त फेरबदल दर्शविणाऱ्या भाग नकाशाची प्रत मुख्य प्रशासक, नविन शहरे, सिडको औरंगाबाद व महानगर आयुक्त, छत्रपती संभाजीनगर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेमध्ये नागरीकांच्या अवलोकनार्थ एक महिन्याच्या कालावधीसाठी ठेवण्यात आली आहे.

सदर अधिसूचनेची प्रत शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

(प्रसाद रा. शिंदे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

BY UNDER SECRETARY TO GOVERNMENT

GOVERNMENT OF MAHARASHTRA

URBAN DEVELOPMENT DEPARTMENT

4TH FLOOR, MAIN BUILDING, MANTRALAYA,

MADAM KAMA MARG,

HUTATMA RAJGURU CHOWK,

MUMBAI - 400 032.

DATED : - 27/02/2026

NOTIFICATION

***The Maharashtra Regional & Town Planning Act, 1966*:-**

No. TPS - 3015/1549/CR-288/2015/UD - 30 :- Whereas, the Government of Maharashtra *vide* Notification No. TPS-3087/22/CR-1/PART-II/UD-12, dated the 7 th October, 1991, promulgated in exercise of the powers conferred by clause *(b)* of sub - section (1) of Section 40 of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (Maharashtra Act No. XXXVII of 1966) (hereinafter referred to as " the said Act") and all other powers enabling it in this behalf, appointed City and and Industrial Development Corporation as Special Planning Authority (hereinafter referred to as " the CIDCO") for Waluj Notified Area (hereinafter referred to as "the said Notified Area") ;

And whereas, the Development Plan of said Notified Area has been sanctioned by the Government under section 31 of the said Act, vide Notification No TPS-3000/4484/CR-235(A)/ 2000/UD-30, dated the 14th August, 2001 and has come into force with effect from the 1st October, 2001. The remaining part of the Development Plan is sanctioned by the Goverment *vide* Notification No. TPS 3001/1498/CR-288(A)/2001/UD-30, dated 23rd July, 2002 and has come into force with effect from 16th September, 2002 (hereinafter referred to as " the said Development Plan");

And whereas, in the said Development Plan, the land between Chhatrapati Sambhajinagar Municipal Corporation and Phase-I area of Nagar-IV of Mauje Golwadi (hereinafter referred to as "the said Land") is included in "No- Urbanization Zone" (hereinafter referred to as "the said Zone");

And whereas, the CIDCO, after following all the legal formalities stipulated under section 37 (1) of the said Act, has submitted to the Government for its sanction a proposal for

modification of the said Development Plan, so as to delete the said Land from the No-Urbanization Zone and to include the same in Residential Zone (hereinafter referred to as "the Proposed Modification");

And whereas, after making necessary enquries and consulting the Director of Town Planning, Maharashtra State, Pune, the Government is of opinion that, the said Land should be deleted from No-Urbanization Zone and the same should be to included in Residential Zone (as shown on Plan) with respect to some terms and conditions;

And whereas, out of the said Land, the land owner of Gut No.11 (part), Smt. Jyoti Rangnath Kale & Smt. Pushpa Prakash Kale have deposited an amount of Rs.2,12,317/- & Rs.2, 12, 317/- respectively as premium amount in the Government Treasury *Vide* challans towards the 50% Government share of 5% premium amount as per the value of the said Land as prescribed in the Annual Statement of Rates (ASR) through the Assistant Director of Town Planning, Chhatrapati Sambhajinagar Branch, Chhatrapati Sambhajinagar and the remaining 50% of 5% premium amount of Rs 2,12,317/- & Rs 2, 12,317/- respectively, has been deposited with CIDCO, Waluj *vide* receipt ;

Now, therefore, in exercise of the powers conferred on it under sub-section *(2)* of section 37of the said Act the Government of Maharashtra hereby sanctions the said Proposed Modification & for that purpose amends the above said Notification dated the 14th August, 2001 as follows :-

" In the Schedule of modification appended to the notification sanctioning the said Development Plan, the following new entry shall be added after the last entry"

ENTRY

" The land bearing Gut No.11(part) (Area 1.96 Hect+ 1.96 Hect Total 3.92 Hect.) of mouje Golewadi, is deleted from the No Urbanization Zone and the land so released is included in the Residential Zone as shown on the plan".

Condition No. 1- *Width of 18 mt. wide road is increased to 24 mt. as shown on plan.*

Condition No. 2 - *As per the provisions of the Development Plan for the Waluj Notified Area, it is mandatory to allot 25% land to CIDCO.*

Condition No. 3 - *While developing the land under modification, in oddition to 10% open space, it is mandatory to provide additional 10% amenity space and for development of amenity space, UDCPR, 2020 Regulation No. 3.5 will be applicable.*

A copy of the Part Plan, showing the afore said sanctioned modification shall be available in the office of the Chief Administrator, New Town, CIDCO Aurangabad and Metropolitan Commissioner, Chhatrapati Sambhajinagar Metropolitan Region Development Authority during office hours on all working days for inspection of public for a period of one month.

This notification shall also be available on the Goverment website www.maharashtra.gov.in

By order and in the name of the Governor of Maharashtra,

(Prasad R. Shinde)
Under Secretary to Government.

शासकीय अधिसूचना, नेमणुका, पदोन्नती इत्यादी

२

अपर आयुक्त व विशेषक निबंधक
सहकारी संस्था,महाराष्ट्र राज्य, पुणे यांजकडून
आदेश

वाचाः-

१. या कार्यालयाचे आदेश जा.क्र. पतसंस्था/सआ-५/खर्च/वसूली आदेश/ २०१८ दि. ०६/०४/२०१८

२. या कार्यालयाचे परिपत्रक जा. क्र. पतसंस्था /सआ-५/वसुली अधिकारी नियुक्ती/फेरनियुक्ती/२०१८, दि. ३१/१०/२०१८

३. मुख्य कार्यकारी अधिकारी, दि लातूर अर्बन को-ऑप बँक लि. लातूर यांचा प्रस्ताव दिनांक ०३/११/२०२५.

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १५६ अन्वये आदेश

जा.क्र. ना.बँका/१-सआ-/दि लातूर अर्बन बँक/का.क १५६/२०२५/३३०१ दिनांक २४/१२/२०२५ :- महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १५६ अन्वये मला प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करुन मी, नागनाथ यगलेवाड, अपर आयुक्त व विशेष निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे या आदेशान्वये **दि लातूर अर्बन को-ऑप बँक लि. लातूर** या बँकेच्या खालील अधिकाऱ्यांना त्यांच्या नावापुढे दर्शविलेल्या कार्यक्षेत्रासाठी कलम ९८ व कलम १०१ अन्वये प्राप्त झालेली वसुली प्रमाणपत्रांची अंमलबजावणीबाबत करावयाच्या कार्यवाहीपुरती महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १५६ अन्वये व नियम १९६१ चे नियम १०७ मधील तरतूदीनुसार खालील अटीस अधीन राहून या आदेशाच्या दिनांकापासून ते दि. ३१/०३/ २०२६ पर्यंत शक्ती प्रदान करीत आहे.

अ. क्र.	अधिकार प्रदान करावयाचे अधिकाऱ्याचे नांव	अधिकार प्रदान करावयाचे अधिकाऱ्यांचा हुद्दा	शक्तीची व्याप्ती	कार्यक्षेत्र (जिल्हा)
१	श्री.नासिर सिकंदर शेख	वरिष्ठ अधिकारी	वसूली अधिकारी	लातूर जिल्हा

अटी :-

१. वसुली अधिकारी यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १५६ व नियम १९६१ चा नियम १०७ मधील तरतुदीनुसार कर्ज वसुलीची कार्यवाही करावी. कर्ज वसूली करताना सहकार कायदा, नियम यातील तरतुदी व परिपत्रकीय सुचनांचे पालन न केल्याचे निदर्शनास आल्यास आवश्यक ती चौकशी करुन आवश्यकता भासल्यास सदरचे प्रदान केलेले अधिकार तात्काळ काढून घेण्यात येतील.

२. सदरचे अधिकार सहकार कायदा कलम ९८ व १०१ अन्वये प्राप्त वसुली दाखल्यांची अंमलबजावणी करण्याकरिता असतील.

३. वसूली अधिकारी यांनी या कार्यालयाने दिनांक ३१/१०/२०१८ रोजी निर्गमित केलेल्या परिपत्रकानुसार दरमहा विहीत नमुन्यात कर्ज वसूलीची माहिती संबंधित जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था यांना सादर करावी.

४. वसूली अधिकार प्रदान केलेल्या व्यक्तीची बदली झाल्यास किंवा सदर व्यक्ती सेवानिवृत्त झाल्यास किंवा सदर व्यक्तीस सेवेतून काढून टाकल्यास किंवा त्याचा मृत्यू झाल्यास, अशा अधिकाऱ्यास प्रदान केलेले अधिकार आपोआप रद्द होतील.

५. वसूली अधिकारी यांनी नमूद केलेल्या कालावधीत वसूलीचे कामकाज समाधानकारक केले नसल्याचे निदर्शनास आल्यास किंवा प्रदान केलेल्या अधिकाराचा गैरवापर करीत असल्याचे निदर्शनास आल्यास, प्रदान केलेले अधिकार काढून घेतले जातील व भविष्यात असे कोणतेही अधिकार अशा व्यक्तीस प्रदान करण्यात येणार नाहीत.

६. शासन निर्णय क्रमांक संकिर्ण १५०४/ प्र. क्र. २३१/१५- स, दिनांक २३/११/२००६ अन्वये वसूली अधिकांऱ्याना तीन सिंहाच्या राजमुद्रेचा वापर करता येणार नाही. त्याऐवजी या कार्यालयाचे परिपत्रक दिनांक ६/६/२०१९ मध्ये निश्चित केलेल्या बँकेच्या नावाच्या मोहरेचा वापर करण्यात यावा.

७. **वसुली अधिकाऱ्यास त्याच्या नावापुढे कोठेही "महाराष्ट्र शासन नियुक्त" आणि किंवा "सिव्हील कोर्ट" "एक्झीक्युटीव्ह कोर्ट" या शब्दांचा अथवा तत्सम शब्दांचा वापर करता येणार नाही.** त्या ऐवजी "वसूली अधिकाऱ्यांनी त्यांच्या नावापुढे वसूली अधिकारी (महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० व नियम १९६१ चे नियम १०७ अन्वये) असे लिहावे.

८. वसूली अधिकाऱ्यास वसूलीसाठी वापर करण्यात येणाऱ्या वाहनावर **"वसूली अधिकारी, लातूर अर्बन को-ऑप बँक लि. लातूर"** असा फलक लावता येईल.

९. वसूली अधिकाऱ्याने पगार जप्तीची कार्यवाही करतांना कर्जदाराच्या/ जामीनदाराच्या पगार कपातीबाबत राष्ट्रीयीकृत बँका वा अन्य बँका यांच्याकडे परस्पर वेतन कपातीचा आदेश देऊन परस्पर पगार कपात करता येणार नाही. संबंधित कर्जदार/जामीनदार ज्या आस्थापनेवर काम करीत आहे त्या आस्थापनेवरील आहरण व संवितरण अधिकारी/पगार करणारा अधिकारी यांचेमार्फत पगारातून कर्ज वसूल करण्याची कार्यवाही करावी.

१०. वसुली अधिकाऱ्यास, थकबाकीदारांकडून वसूली दाखल्यानुसार वसूलपात्र रक्कम व या कार्यालयाचे कलम १५६ आणि त्याखालील नियम १०७ अन्वये आदेश दि. ०६/०४/२०१८ मध्ये नमूद केल्याप्रमाणे व दराने अंमलबजावणी खर्चाची रक्कम याशिवाय इतर कोणतीही रक्कम वसूल करता येणार नाही.

११. या कार्यालयाचे दिनांक ३१/१०/२०१८ रोजीच्या परिपत्रकीय सुचनांचे वसूली अधिकारी यांनी तंतोतंत पालन करावे. बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दरमहा वसूली अधिकाऱ्यांचे कामकाजाचा कर्जदारानिहाय आढावा परिपत्रकातील प्रपत्र पाच मध्ये नमूद केल्याप्रमाणे घ्यावा.

१२. वसूली अधिकारी यांनी निर्गमित करावयाच्या नोटीस/आदेश/ घोषणा यामध्ये त्यांना अधिकार प्रदान केलेल्या या आदेशाचा संदर्भ नमूद करावा. वसूली अधिकारी यांनी नोटीसा बजावताना नोटीसमध्ये त्यांचे नाव पदनाम व भ्रमणदुरध्वनी क्रमांक नमूद करणे आवश्यक आहे.

१३. वसुली अधिकार प्रदान केलेल्या व्यक्तींनी किमान तीन वर्षातून एकदा मान्यताप्राप्त संस्थेकडून तीन दिवसाचे वसूलीचे प्रशिक्षण घेणे आवश्यक राहील.

(नागनाथ यगलेवाड)
अपर आयुक्त व विशेष निबंधक,
सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.

३

पोलीस आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांजकडून
भारतीय नागरीक सुरक्षा संहीता २०२३ चे कलम १६३ प्रमाणे प्रतिबंधक आदेश.

गोपनिय जा.क्र.विशा-३/आदेश/२०२६-१३७९ छत्रपती संभाजीनगर, दिनांक १६/०४/२०२६. :- ज्या अर्थी माझ्या असे निदर्शनास आणून देण्यात आले आहे की, १. सर्वसाधारणपणे काही गट आणि विशेष करुन तृतीयपंथी एकटयाने किंवा एकत्रितपणे एकत्र येऊन लग्न, किंवा इतर धार्मिक प्रसंगी किंवा जन्म/मृत्यु इत्यादी ठिकाणी आढळून आलेले आहेत. तसेच हे लोक विना निमंत्रित किंवा बोलल्या शिवाय शहरातील विविध भागातील लोकांच्या निवासस्थानी भेट देत आहेत आणि अशा लोकांचे टोळके अशा वस्तीत घुसून रस्त्यावर जबरदस्तीने पैशांची मागणी करत आहेत आणि अश्लील आणि धमकावणारे वर्तन करत असल्याचे निदर्शनात आले आहे.

२. जेव्हा त्यांच्या भीतीदायक वागणुकीमुळे जे लोक सणासुदीच्या प्रसंगी किंवा विशिष्ट धार्मिक कार्यात किंवा कुटुंबातील जन्म/मृत्यु काही समस्यामध्ये गुंतलेले असतात त्यांना ते स्वच्छेने देऊ इच्छित असलेल्या पैशापेक्षा जास्त पैसे देण्यास भाग पडतात. तसेच असे आढळून आले आहे की सर्वसाधारणपणे काही गट आणि विशेष करुन तृतीयपंथी ट्रॅफिक जंक्शन, रोडवर, इत्यादीसह विविध ठिकाणी फिरत आहे आणि वाहनचालक व इतर जाणाऱ्या प्रवाशांना/ नागरिकांना त्रास देत आहेत आणि त्यांना पैसे देण्यास भाग पाडत आहेत.

३. तसेच असे निदर्शनास आले आहे की हे कृत्य जरी बेकायदेशीरपणे एकत्र येणे, खंडणी वसुल करणे, सार्वजनिक उपद्रव निर्माण करणे इत्यादी गुन्ह्यांसह भारतीय न्याय संहीतेच्या विविध कलमा खाली गुन्हा असला तरी अशा तृतीयपंथी यांच्या भीतीमुळे लोक त्याच्या विरुध्द तक्रार करण्यास पुढे येऊ शकत नाही, आणि म्हणूनच अशा प्रकारच्या उपद्रव किंवा मोठया प्रमाणावर जनतेला धोका निर्माण होण्यापासून रोखण्याच्या दृष्टीकोनातून खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

i) सर्वसाधारण पणे काही गट आणि विशेष करुन तृतीयपंथी यांना एकटयाने किंवा एकत्रितपणे याद्वारे शहरात फिरण्यास आणि निवासस्थान/ आस्थापना इत्यादी ठिकाणी भेट देण्यास मनाई करण्यात येत आहे. तसेच आशा सदस्यांना घरांच्या/आस्थापना इत्यादी ठिकाणी भेट देण्यास मनाई करण्यात येत आहे. तसेच आशा सदस्यांना घरांच्या/ आस्थापनाच्या मालकांनी आमंत्रित न करता (जेथे कुटुंबातील जन्म/मृत्यु/उत्सव/लग्न इत्यादी कार्यक्रम आहे) भेट देण्यास मनाई करण्यात येत आहे.

ii) त्यानां ट्रॅफिक/जंक्शन चौकात रस्त्यावर एकटयाने किंवा त्यांच्या समुहाने एकत्र येण्यास आणि वाहन चालक/प्रवाशांकडून पैसे वगैरे मागण्यासही मनाई करण्यात येत आहे.

४. **मी प्रविण पवार, पोलीस आयुक्त छत्रपती संभाजीनगर** आणि कार्यकारी दंडाधिकारी मला कलम १६३ भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ अन्वये प्रदान केलेल्या अधिकारांव्दारे, छत्रपती संभाजीनगर पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रात वरील प्रमाणे प्रतिबंध करण्याचे आदेश पुढील ६० दिवसांसाठी दिनांक १५/०४/२०२६ ते दिनांक -१३/०६/२०२६ पर्यंत देत आहे.

५. हा आदेश दिनांक १५/०४/२०२६ रोजी ००.०१ पासून दिनांक १३/०६/२०२६, रोजी २४.०० वाजेपर्यंत त्यापुर्वी मागे घेतल्या शिवाय लागु राहील.

६. या आदेशाचे उल्लंघन करणारी कोणतीही व्यक्ती भारतीय न्याय संहिता, २०२३ च्या कलम २२३ अन्वये दंडनीय असेल.

७. सर्व संबंधितांना वैयक्तिकरित्या नोटीस बजावली जाऊ शकत नसल्यामुळे, याद्वारे एकतर्फी आदेश पारित करण्यात आला आहे. लोकांच्या माहितीसाठी प्रसार माध्यमाद्वारे आणि सर्व पोलीस ठाणे, सर्व स.पो. आ., सर्व पो.उप. आ., महानगरपालिका वॉर्ड ऑफिस, तहसील ऑफिसच्या नोटिस बोर्डवर प्रती चिकटवून प्रकाशित केला आहे.

सदरचा आदेश माझ्या सही शिक्यानिशी आज दिनांक दि. १६/०४/ २०२६ रोजी जारी करण्यात आला आहे.

(प्रविण पवार) भा.पो.से.
पोलीस आयुक्त, छत्रपती संभाजीनगर

४

प्रभारी पोलीस आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांजकडून
भारतीय नागरीक सुरक्षा संहीता २०२३ चे कलम १६३ अंतर्गत आदेश.
आदेश

गोपनिय जा. क्र. विशा-३/आदेश/छ. संभाजीनगर/१०३९-२०२६ छ.संभाजीनगर, दि. ३०/०३/२०२६ :- १. ज्या अर्थी दहशतवादी / राष्ट्रविरोधी घटक ड्रोन, रिमोट कंट्रोल्ड मायक्रो-लाइट एअरक्राफट, पॅराग्लायडर, पॅरा मोटर्स, हॅण्ड ग्लायडर्स हॉट एअर बलून इत्यादीचा वापर करुन त्यांच्या हल्ल्यांमध्ये आणि त्याद्ववारे व्हीव्हीआयपींना लक्ष्य करु शकतात, मोठया प्रमाणावर सार्वजनिक जीवन धोक्यात आणू शकतात, सार्वजनिक मालमत्तेची नासधूस करु शकतात आणि छत्रपती संभाजीनगर पोलीस आयुक्तालय क्षेत्रात कायदा व सुव्यवस्था बिघडवू शकतात.

२. ज्या अर्थी अशा ड्रोन, रिमोट कंट्रोल्ड मायक्रो-लाइट एअरक्राप्ट, पॅराग्लायडर, पॅरा मोटर्स, हॅण्ड ग्लायडर्स हॉट एअर बलून इत्यादी द्वारे संभाव्य घातपात रोखण्यासाठी छत्रपती संभाजीनगर पोलीस आयुक्तालयात अशा घटकांच्या कारवाया, ज्यासाठी काही प्रतिबंधात्मक आणि सक्रिय उपाययोजना करणे आवश्यक आहे.

३. म्हणून मी पंकज अतुलकर, प्रभारी पोलीस आयुक्त छत्रपती संभाजीनगर आणि कार्यकारी दंडाअधिकारी मला कलम, १६३ भारतीय नागरीक सुरक्षा संहीता २०२३ अन्वये प्रदान केलेल्या अधिकाराद्वारे ड्रोन, रिमोट कंट्रोल्ड मायक्रो-लाइट एअरक्राप्ट, पॅराग्लायडर, पॅरा मोटर्स, हॅण्ड लायडर्स हॉट एअर बलून इत्यादीच्या उडाण क्रियांना छत्रपती संभाजी नगर पोलीस आयुक्तालयांच्या कार्यक्षेत्रात प्रतिबंध करण्याचे आदेश पुढील ६० दिवसांसाठी म्हणजे ३१/०३/२०२६ ते २९/०५/२०२६ पर्यत देत आहे. छत्रपती संभाजीनगर पोलीसा कडून हवाई पाळत ठेवणे किंवा पोलीस आयुक्त छत्रपती संभाजीनगर यांच्या विशिष्ट परवानगीने करण्यात येणारी कारवाई अपवाद राहील.

४. हा आदेश दि.३१/०३/२०२६ रोजी ००.०० ते रोजी पासून दिनांक २९/०५/२०२६ चे २४.०० वाजेपर्यंत त्यापूर्वी मागे घेतल्याशिवाय लागू राहील.

५. या आदेशाचे उल्लघंन करणारी कोणतीही व्यक्ती भारतीय न्याय संहीता २०२३ च्या कलम, २२३ अन्वये दंडनीय असेल.

६. सर्व संबधितांना वैयक्तीकरित्या नोटीस बजावली जावू शकत नसल्यामुळे याद्वारे एकतर्फी आदेश पारित करण्यात आला आहे. लोकांच्या माहितासाठी प्रसार माध्यमांद्वारे आणि सर्व पोलीस ठाणे सर्व पोलीस ठाणे सर्व स.पो.आ. सर्व पो.उप.आ.महानगर पालीका बॉर्ड ऑफीस, तहसील ऑफीसच्या नोटीस बोर्डवर प्रती चिकटवुन प्रकाशित केले जाईल.

सदचा आदेश माझ्या सही व शिक्यानिशी आज दिनांक ३०/०३/२०२६ रोजी दिला आहे.

(पंकज अतुलकर)भा.पो.से.
प्रभारी पोलीस आयुक्त,
छत्रपती संभाजीनगर

५

अप्पर जिल्हादंडाधिकारी बीड, यांजकडून

आदेश

वाचा :-

१. शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, बीड यांचे पत्र क्र. शिविमा/SSC/HSC/2025-26/588 दि ०६/०२/२०२६

२. भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३

विषय :- उच्च माध्यमिक प्रमाणपत्र व माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा फेब्रुवारी / मार्च २०२६ करिता जिल्हयात भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ प्रमाणे मनाई आदेश लागू करणे बाबत.

आदेश

क्र.४२८/२०२६/गृह विभाग/पोल-१/परीक्षा/भा.ना.सु.सं/१६३ ज्याअर्थी, संदर्भ क्र. १ चे उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा दिनांक १०/०२/२०२६ ते १८/०३/२०२६ आणि माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा दि. २०/०२/२०२६ ते दि. १८/०३/२०२६ या कालावधीत आयोजित करण्यात आल्या आहेत. सदरील परीक्षा सुव्यवस्थीत पार पाडण्याच्या दृष्टीकोनातून परीक्षा केंद्राच्या परिसरात जमाबंदी आदेश लागू करण्यास विनंती केली आहे.

आणि ज्याअर्थी, सदर परीक्षा शांततेच्या वातावरणात पार पाडण्यासाठी परीक्षा चालू असताना बाहेरच्या लोकांकडून उपद्रव होण्याची शक्यता असते. तसेच परीक्षा चालू असताना कॉपी पुरविण्याचा प्रयत्न करतात, तसेच परिसरातील झेरॉक्स सेंटरचा कॉपी पुरविण्यासाठी दुरुपयोग होण्याची शक्यता लक्षात घेता, परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांना व परिक्षेसाठी नियुक्त अधिकारी/कर्मचारी यांना बाहेरील व्यक्तींचा त्रास होऊ नये, तसेच जिल्हयात कॉपीमुक्त अभियान राबविण्यासाठी जिल्हयातील फेब्रु/मार्च २०२६ मध्ये घेण्यात येणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा व माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा केंद्राचे १०० मिटर परिसरात भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ नुसार मनाई आदेश लागू करणे आवश्यक असल्याची माझी खात्री झालेली आहे.

त्याअर्थी, मी, शिवकुमार स्वामी, अपर जिल्हादंडाधिकारी, बीड मला प्राप्त अधिकारानुसार भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ मधील शक्तींचा वापर करुन बीड जिल्हयातील फेब्रु/मार्च २०२६ मध्ये घेण्यात येणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा व माध्यमिक शालांत प्रमाणपत्राच्या सर्व परीक्षा केंद्राचे १०० मीटर परिसरात व परिक्षेचे साहित्य ठेवण्यात आलेल्या ठिकाणी शांतता व सुव्यवस्था अबाधित रहावी व अनाधिकृत कृत्य होऊ नयेत याकरिता खालील कृत्य करण्यास मनाई करीत आहे आणि खालील आदेश देत आहे.

१. सदर आदेश परिक्षेच्या कामकाजासाठी नियुक्त अधिकारी व कर्मचारी यांना लागू राहणार नाही.

२. परीक्षा केंद्राबाहेर व परिसरात परिक्षेसाठी नियुक्त अधिकारी / कर्मचारी व परिक्षार्थी यांना वगळून दोन किंवा दोनपेक्षा जास्त व्यक्ती एकत्र येण्यास प्रतिबंध करण्यात येत आहे.

३. परीक्षा केंद्राचे १०० मी. परिसरातील सर्व झेरॉक्स केंद्र, फॅक्स केंद्र व ध्वनीक्षेपक इ. परीक्षा सुरु होण्याच्या एक तास अगोदर पासून ते परीक्षा पेपर संपेपर्यंतच्या कालावधीपर्यंत चालू ठेवण्यासाठी प्रतिबंध करण्यात येत आहे.

४. शासकीय व परिक्षेसंबंधीत कर्मचाऱ्यांच्या व विद्यार्थ्यांच्या वाहनाव्यतिरिक्त इतर अनाधिकृत वाहनांना परीक्षा केंद्राच्या १०० मिटर परिसरात येण्यास प्रतिबंध करण्यात येत आहे.

५. हे आदेश कोणत्याही धार्मिक कार्यक्रम, मयताची अंत्ययात्रासाठी लागू राहणार नाहीत.

हे आदेश बीड जिल्हयाच्या हद्दीतील उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा व माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा केंद्राचे १०० मी. परिसरात व परीक्षा साहित्य ठेवलेल्या ठिकाणी दि. १०/०२/२०२६ ते दि. १८/०३/२०२६ या कालावधीत त्या-त्या दिवशीच्या परिक्षेच्या वेळेच्या एक तास अगोदर ते परीक्षा पेपर संपेपर्यंतच्या कालावधीसाठी लागू राहातील.

सदरचा आदेश आज रोजी माझ्या सही शिक्यानिशी दिला

स्वाक्षरीत/-
(शिवकुमार स्वामी)
अप्पर जिल्हादंडाधिकारी बीड.

६

जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली यांजकडून

वाचा :- १) महाराष्ट्र शासन राजकीय आणि सेवा विभाग शासन निर्णय क्र. पी १३ दिनांक ०६/०१/१९५८

२) सामान्य प्रशासन विभाग मंत्रालय मुंबई अधिसुचना क्र. पिएचडी - १०८२/२१००ए/२९/दि. २६/०६/१९८२

अधिसूचना

जा.क्र.२०२६/संकीर्ण/कावी/ दिनांक. ०५/०१/२०२६ उपरोक्त शासन निर्णयाद्वारे प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी राहुल गुप्ता, जिल्हाधिकारी हिंगोली सन २०२६ या वर्षाकरीता हिंगोली जिल्ह्यासाठी खालील तक्त्यामध्ये दर्शविण्यात आलेल्या यात्रा व सणाच्या दिवशी स्थानिक सुटया अधिसुचनेद्वारे जाहीर करीत आहे.

सन २०२६ करिता जाहीर केलेल्या स्थानिक सुट्टया

अ.क्र.	दिनांक	वार	तपशील
१	७ जुलै २०२६	मंगळवार	सय्यद नुरोद्दिन नुरी शहिद रहेमतुल्ला अलेह नुरीबाबा उर्स ता.कळमनुरी
२	१८ सप्टेंबर २०२६	शुक्रवार	जेष्ठागौरी पुजन (महालक्ष्मी)
३	९ नोव्हेंबर २०२६	सोमवार	अश्विन अमावस्या (अभ्यंगस्नान) दीपावली

उपरोक्त तीन स्थानिक सुट्टया हिंगोली जिल्ह्यायातील सर्व शासकीय कार्यालये, जिल्हा परिषदे अंतर्गत कार्यालये, नगर परिषद कार्यालये, स्थानिक स्वराज्य संस्थेची कार्यालये, जिल्ह्यातील शासकीय कोषागार महामंडळाची कार्यालये व इतर सर्व खाजगी शैक्षणिक संस्था यांना लागू राहतील.

(राहुल गुप्ता भा.प्र.से.)
जिल्हाधिकारी हिंगोली.

७

उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, हिंगोली.

भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३ अन्वये समुचित शासनाने वापरावयाच्या नमुन्यामधील मार्गदर्शक तत्वांसंदर्भातील कलम ११ (१) खालील अधिसूचना

जा.क्र.२०२६/डिग्रस साठवण तलाव/सिआर-०१.— ज्याअर्थी महाराष्ट्र शासनाने भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३ (२०१३ चा ३०) (यापुढे ज्याचा उल्लेख उक्त अधिनियम असा करण्यात येईल.) याच्या कलम ३ च्या खंड (इ) च्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन काढण्यात आलेली शासकीय अधिसूचना महसूल व वन विभाग क्र.संकिर्ण-१९/२०१४/प्र.क्र.७७/भाग-२/अ-२ दि.१९.०१.२०१५ अन्वये (यात यापुढे जिचा निर्देश उक्त अधिसूचना असा करण्यात आला आहे.) असे अधिसूचित केले आहे की, उक्त अधिनियमाचे कलम ३ च्या खंड (झेड अे) मध्ये व्याख्या केलेल्या एखाद्या सार्वजनिक प्रयोजनासाठी, एखाद्या जिल्ह्यातील ५०० हेक्टर पेक्षा अधिक नसेल इतक्या क्षेत्राकरीता जमीन संपादन करण्याच्या संबंधात, अशा जिल्ह्याचा जिल्हाधिकारी हा समुचित शासन मानण्यात येईल.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिसूचनेनुसार समुचित शासन असलेल्या, हिंगोली जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यास यासोबत जोडलेल्या अनुसूची एक मध्ये अधिक तपशिलवार वर्णन केलेल्या जमीनी (यात यापुढे ज्यांना निर्देश उक्त जमीनी असा करण्यात आला आहे) कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग, हिंगोली यांच्या डिग्रस साठवण तलाव अंतर्गत ह्या सार्वजनिक प्रयोजनासाठी (यात यापुढे ज्याचा उल्लेख उक्त सार्वजनिक प्रयोजन असा करण्यात आला आहे) आवश्यक आहेत अथवा त्यांची गरज भासण्याची शक्यता आहे. ज्याच्या स्वरुपाचे विवरण यासोबत जोडलेल्या अनुसूचि दोन मध्ये दिलेले आहे, आणि म्हणून उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोटकलम (१) च्या तरतुदींन्वये याद्वारे असे अधिसूचित करण्यात येते की, उक्त जमिनीची उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता भासण्याची शक्यता आहे.

आणि ज्याअर्थी, प्रस्तावित भूमि संपादनाच्या अनुषंगाने बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे, यासोबत जोडलेल्या अनुसूची तीन मध्ये दिलेली आहेत.

आणि ज्याअर्थी सामाजिक परिणाम निर्धारण सारांश यासोबत जोडलेल्या अनुसूचि चार मध्ये दिलेला आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त अनिनियमाचे कलम ४३ च्या पोटकलम (१) अन्वये पुनर्वसन व पुनर्वसाहत या प्रयोजनासाठी नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशिल यासोबत जोडलेल्या अनुसूचि पाच मध्ये दिलेला आहे.

त्याअर्थी, आता असे घोषित करण्यात येते की, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट कलम (४) नुसार कोणतीही व्यक्ती, ही अधिसूचना प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून ते उक्त अधिनियमाच्या प्रकरण चार खालील कार्यवाही पुर्ण होईल त्या कालावधीपर्यंत उक्त जमिनीचा अथवा तिच्या भागाचा कोणताही व्यवहार करणार नाही किंवा उक्त जमिनीवर कोणताही भार निर्माण करणार नाही.

परंतु, उक्त जमिनीच्या अथवा तिच्या भागाच्या मालकाने अर्ज केल्यावर, जिल्हाधिकाऱ्यास विशेष परिस्थितीचे कारणे लेखी नमूद करुन अशा मालकास उपरोक्त तरतूदीच्या प्रवर्तनातून सूट देता येईल.

परंतु आणखी असे की, जर कोणत्याही व्यक्तीने या तरतुदीचे बुध्दीपुरस्पर उल्लंघन केल्यामुळे तिला कोणत्याही हानींची किंवा क्षतींची जिल्हाधिकाऱ्याकडून भरपाई दिली जाणार नाही. तसेच उक्त अधिनियमाच्या कलम ११ (५) अनुसार, जिल्हाधिकारी भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम २०१३ (ज्याचा उल्लेख यापुढे उक्त नियम असा करण्यात येईल.) यांच्या नियम १० च्या उपनियम (३) द्वारे विहित केल्याप्रमाणे भूमि अभिलेखाच्या अद्यावतीकरणाचे काम हाती घेणार असल्याने व पुर्ण करणार असल्याचे देखील घोषित करण्यात येत आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये समुचित शासन असलेल्या जिल्हाधिकारी यांनी उक्त अधिनियमा खालील जिल्हाधिकाऱ्याची कामे पार पाडण्यासाठी उपविभागीय अधिकारी, हिंगोली यांना पदनिर्देशीत केलेले आहे.

(समाधान घुटूकडे)
उपविभागीय अधिकारी तथा
भूसंपादन अधिकारी, हिंगोली.

अनुसूचि एक
जमिनीचे वर्णन
संपादित करावयाच्या जमिनींचे वर्णन

गाव :- डिग्रस कऱ्हाळे ता.जि.हिंगोली		
अ.क्र.	**गट क्रमांक**	**संपादित करावयाचे क्षेत्र हेक्टर आरमध्ये**
१	१७२	२.८४
२	१८०	४.०२
३	१८१	१.४६
४	१८२	०.८५
५	१८३	०.४१
६	१८६	०.३०
७	१८७	१.७३
८	२३६	०.१०
९	२३७	०.१०
१०	२४१	०.१०
११	२४२	०.१०
१२	२४३	०.१०
१३	२५३	०.१०
१४	२५४	०.१०
१५	२५५	०.१०
१६	२५६	१.७७
१७	१७९	०.१०
एकुण		**१४.२८**

गाव :- दाटेगांव ता.जि.हिंगोली		
अ.क्र.	**गट क्रमांक**	**संपादित करावयाचे क्षेत्र हेक्टर आरमध्ये**
१	१५७	०.४६
२	१५८	०.३२

३	१६३	०.४५
४	१६४	०.२२
५	१६५	०.०३
६	१६६	१.४५
७	१६७	०.७५
८	१६८	३.६३
९	१६९	०.१०
१०	१७०	०.१३
११	१७१	०.०९
१२	१७२	३.९४
१३	१७३	०.०४
१४	१७४	०.७४
१५	१७५	०.७७
१६	१७६	४.३०
१७	१७७	१.७४
१८	१७८	०.८७
१९	१७९	०.०१
२०	१८०	०.९८
२१	१८१	१.८९
२२	१८२	१.२३
२३	१८३	१.०२
२४	१८४	९.६१
२५	१८५	०.६९
२६	१८६	०.७८
२७	१८७	०.६२
२८	१८८	२.४५

२९	१९०	१.०९
३०	१९१	०.४८
३१	१९२	०.५४
३२	१९३	१.३०
३३	१९५	०.५०
३४	१९६	०.३६
३५	१९७	०.७६
३६	१९८	०.९६
३७	१९९	२.०५
३८	२००	०.४४
एकुण		**४७.७९**

गाव :- लोहगांव ता.जि.हिंगोली		
अ.क्र.	**गट क्रमांक**	**संपादित करावयाचे क्षेत्र हेक्टर आरमध्ये**
१	२	०.१९
२	३९६	२.२०
३	४००	०.२९
४	४०९	१.४२
५	४१०	९.५६
६	४११	२.०७
७	४१३	२.४१
८	४१४	०.०४
९	४१५	०.०६
१०	४१६	०.०३
११	४१७	२.५७
१२	४४३	०.६३
१३	४४६	०.३०

१४	४४७	२.२३
१५	४४८	०.६४
१६	४४९	०.६२
१७	४५०	१.२७
१८	४५१	६.६१
१९	४५२	७.५१
२०	४५३	६.५४
२१	४५४	४.६८
२२	४५५	५.३१
२३	४५६	१.१७
२४	४५७	१.३२
२५	४५८	५.०४
२६	४५९	३.१९
२७	४६०	१.३७
२८	४६१	०.५३
२९	४६२	१.३१
३०	४६३	२.४३
३१	४६४	१.९१
३२	४६५	२.०२
३३	४६६	०.०५
३४	४६७	०.०५
३५	४६८	०.८३
३६	४६९	०.७७
३७	४७०	०.७८
३८	४७१	०.२२
३९	४७२	०.२२

४०	४८१	०.११
४१	४८२	०.०४
४२	४८३	०.०४
४३	४८४	०.६८
४४	४८५	०.६३
४५	४८६	०.९०
४६	४८७	०.०२
४७	४८८	०.७८
४८	४८९	०.०३
४९	४९०	१.०७
५०	४९१	०.८२
५१	४९२	१.०४
५२	४९३	१.२४
५३	४९४	७.३१
एकुण		**९५.१०**

अनुसूचि दोन

सार्वजनिक प्रयोजनाबाबत विवरण

प्रकल्पाचे नाव	डिग्रस साठवण तलाव
प्रकल्प कार्याचे वर्णन	लघु पाटबंधारे
समाजाला मिळणारे लाभ	कृषि सिंचन, आर्थिक, रोजगार लाभ

अनुसूचि तीन

भूमि संपादनाच्या अनुषंगाने बाधित व्यक्तीचे विस्थापन होत नाही म्हणून अनुसूचि तीन लागु नाही.

अनुसूचि चार

सामाजिक परिणाम निर्धारण सारांशः

भूमि संपादनाच्या अनुषंगाने बाधित व्यक्तीचे विस्थापन होत नाही म्हणून सामाजिक परिणाम निर्धारण अभ्यास करणाऱ्या अधिकरणाचा सामाजिक परिणाम निर्धारण सारांश लागु नाही.

अनुसूचि पाच

नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशिल

भूधारकाचे विस्थापन होत नसल्यामुळे प्रशासक नियुक्ती लागु नाही.

टिप : उक्त जमिनीबाबतचे आराखडे व तपशील उपविभागीय अधिकारी कार्यालय, हिंगोली येथे कार्यालयीन वेळेत निरिक्षण करण्यास उपलब्ध आहे.

(समाधान घुटूकडे)
उपविभागीय अधिकारी तथा
भूसंपादन अधिकारी, हिंगोली.

८

सहायक जिल्हाधिकारी तथा उपविभागीय अधिकारी भोकरदन. यांजकडून

भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ अन्वये कलम १९ (१) ची

अधिसुचना

